# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०४/२०२६ (सोमवार )**

## चोरीचा गुन्हा उघड,
## चारचाकी वाहनासह ३ लाख ९५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त , स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला :-** दिनांक १०/०४/२०२६ रोजी पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी वाहीद जब्बार अंसारी, वय २५ वर्ष, रा. सोनेगाव, ता. जि. नागपूर यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी यांचे मौजा सोनेगाव लोधी शिवार येथे असलेल्या पंचरचे दुकानातील नट खोलण्याच्या दोन मशीन, तीन जॅक, पंचर बनवायच्या मशीन व इतर साहित्य असा एकुण ९५,०००/- रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे. नमुद रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बेला येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान दिनांक १२/०४/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेत असता **आरोपी नामे १) शाहिद खान फिरोज खान, वय २४ वर्ष, रा. अवलीया नगर, बडा ताजबाग नागपुर २) अब्दुल फैज अब्दुल रफिक, वय २३ वर्ष, रा. गौशिया कॉलनी, पठाण पेट्रोल पंप मागे, बडा ताजबाग नागपुर ३) रोहित रामदास परतेकी, वय ३० वर्ष, रा. न्यु बिडीपेठ एनएमसी शाळेमागे नागपुर** हे असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपींचा शोध घेऊन त्यांना

ताजबाग, नागपूर येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या आणखी एका साथीदारासह पोलीस स्टेशन बेला परिसरात पंचरचे दुकानात चोरी केल्याचे कबुल केले. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयात १) ०२ नग नटबोल्ट खोलण्याच्या मशीन किंमती ३०,०००/— रूपये, २) ०३ नग जॅक किंमती ३०,०००/—रूपये ३) ०३ नग वाहनाच्या लोखंडी डिक्स किंमती ३०,०००/—रूपये ४) पंचर तयार करण्याची हिट मशीन व पाने टॉबी इतर साहित्य किंमती ५,०००/—रूपये ५) गुन्हयात वापरलेली होंडा वरणा कार क्र. एम एच—४३/व्ही—६६०० किंमती ३,००,०००/—रूपये असा एकुण ३,९५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपी क्र. १) ते ३) यांना अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.**



# नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत घेण्यात आला रूटमार्च आणि दंगा काबु योजनेचा सराव

आगामी **डॉ. बाबासाहेब आंबडेकर** जयंती उत्सव शांततेत व सुव्यवस्थेत पार पडवा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १२/०४/२०२६ आणि १३/०४/२०२६ रोजी खालील पोलीस स्टेशनला रूट मार्च घेण्यात आणि दगांकाबु योजनेचा सराव घेण्यात आला. आला.

**दिनांक १२/०४/२०२६ रोजी घेण्यात आलेले रूट मार्च आणि दंगा काबु योजना सराव**

**पोलीस स्टेशन उमरेड** :– पोलीस स्टेशन उमरेड येथे श्रीमती वृष्टी जैन, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड यांचा नेतृत्वात पोलीस स्टेशन उमरेड शहर येथे नगरपरिषद कार्यालय समोर व भिसी नाका चौक उमरेड येथे दगांकाबु योजनेचा सराव घेण्यात आला. सदर वेळी श्री धनाजी जळक पोलीस निरीक्षक उमरेड, पोलीस स्टेशन उमरेड चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार, १ दंगा नियंत्रण पथकासह गृहरक्षक हजर होते.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :– पोलीस स्टेशन पाचगाव येथे पोलीस निरीक्षक श्री. रवींद्र मानकर, प्रभारी अधिकरी पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या उपस्थितीत पाचगाव शहर येथे बुद्ध विहार पाचगाव पासून शहराचे मुख्य मार्गाने रूट मार्च घेण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय चौक येथे दगांकाबु योजनेचा सराव घेण्यात आला. सदर रूटमार्च मध्ये पोलीस स्टेशन पाचगाव चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार, १ दंगा नियंत्रण पथकासह गृहरक्षक हजर होते.

**पोलीस स्टेशन कुही** :– पोलीस स्टेशन कुही येथे पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकरी पोलीस स्टेशन कुही यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन कुही येथे रुक्खड बाबा चौक सिल्ली रोड कुही येथे दगांकाबु योजनेचा सराव घेण्यात आला. सदर वेळी पोलीस स्टेशन कुही चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार, १ दंगा नियंत्रण पथकासह गृहरक्षक हजर होते.

**दिनांक १३/०४/२०२६ रोजी घेण्यात आलेले रूट मार्च**

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— पोलीस स्टेशन वेलतुर येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत मिसाळे, प्रभारी अधिकरी पोलीस स्टेशन वेलतुर यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन वेलतूर टाऊन येथे पोलीस स्टेशन ते बाजार चौक ते गुजरी चौक ते बौद्ध विहार मुख्य मार्गाने रूट मार्च करण्यात आला. सदर रूटमार्चमध्ये पोलीस स्टेशन वेलतुर चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत भोयर, प्रभारी अधिकरी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांचे नेतृत्वात मौजा टाकळघाट येथे अमर स्कूल ते मेन रोड टाकळघाट, शिवाजी महाराज चौक टाकळघाट व किरमीटी भारकस येथे ग्रामपंचायत किरमीटी भारकस ते संपूर्ण गावांमधून रूट मार्ग घेण्यात आला. सदर रूटमार्च मध्ये पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.

**पोलीस स्टेशन वडोदा** :— पोलीस स्टेशन वडोदा येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. मनोज गदादे, प्रभारी अधिकरी पोलीस स्टेशन वडोदा यांचे नेतृत्वात वडोदा टाऊन येथे पोलीस स्टेशन वडोदा ते शिवाजी चौक ते आंबेडकर चौक ते झेंडा चौक ते बाजार चौक ते शिवाजी चौक असा गावातील मुख्य मार्गाने रूट मार्च घेण्यात आला. सदर रूटमार्च मध्ये पोलीस स्टेशन वडोदा चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.



पोलीस स्टेशन पाचगाव




ओपस
BIRLA
opus


POLICE
MAHARASHTRA
POLICE



पोलीस स्टेशन वेलतुर



पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी




**पोलीस स्टेशन वडोदा**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द,एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

दिनांक ११/०४/२०२६ **रोजी** सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी स्वप्नील प्रकाश तावाडे, रा. झाकीर हुसेन, वार्ड बल्लारपुर जि. चंद्रपूर** हा मौजा खानगाव रोड, विदर्भ नगरी ले आउट सावनेर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत मौजा बस स्टॉप कळमेश्वर परिसर येथे आरोपी नामे १) सागर संजय शिंदे, वय २६ वर्ष, वार्ड नं. १४, हुडको कॉलनी कळमेश्वर २) मो. महफुज आलम मो. जलील अंसारी, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र ०२, गणेश नगरी, कळमेश्वर ३) आदीत्य भगवान कुकडे, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र ३, कळमेश्वर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद ०४ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या,आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १२/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल रसायन सडवा, मोहाफुल दारू असा एकुण ९३,२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन पाचगाव** येथे महिला आरोपी हिचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे विठोबाजी किशन उदापुरे, वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, गुमथळा ता. कामठी, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) नामे गजानन रामचंद्र नांदणे, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र. १, नारा वर्धा, जि. वर्धा, ह. मु. वार्ड क्र. ४, खैरगाव २) कुसुमाकर वासुदेव सोनोने, वय ५१ वर्ष, रा. उमरी वडेगाव,याचे वर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी क्र. १) नामे अनिल भानुदास सोनोने, वय ३० वर्ष, रा. खरबडी, ता. नरखेड २) राजेश भुजल सोलंकी, वय ३८ वर्ष, रा. उमठा ता. नरखेड ३) नारायणसिंग रामसिंग दरोगा चुडावत, वय ५८ वर्ष, रा. भारसिंगी, ता. नरखेड ४) महिला आरोपी ५) प्रकाश माधव घोसले, वय ४० वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड ६) नरेन्द्रं हरिदास सलाम, वय ३१ वर्ष, रा. झोलवाडी, ता. नरखेड यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे योगेश मनोहररावजी ठवरे, वय ३४ वर्ष, रा. मानीकवाडा बेलोना, ता. नरखेड, ह. मु. उमरी (जामडा पाणी) याचेवर १ गुन्हा नोंद, अशा १२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १२ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १०९ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा ३) १९८० मिली देशी दारू असा एकुण ९३,२८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने